दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

• वर्ष १७ वे • अंक ९६ • MAHMAR/2006/17212 • रायगड • बुधवार दि.६ जुलै २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# अतिवृष्टीतील मदत कार्यावर मुख्यमंत्र्यांचे लक्ष

## एनडीआरएफसह अन्य यंत्रणांना सज्ज राहण्याचे निर्देश

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोकणासह राज्याच्या काही भागात सुरु असलेल्या जोरदार पावसाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आपत्ती व्यवस्थापन आणि मदत कार्यावर लक्ष ठेऊन आहेत. पूर परिस्थितीवर उपाययोजना म्हणून राज्यातील विविध जिल्ह्यात राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन दल (एनडीआरएफ) आणि राज्य आपत्ती व्यवस्थापन दलाच्या (एसडीआरएफ) ११ टीम तैनात करण्यात आल्या आहेत. तसेच बेस स्टेशनवर एनडीआरएफच्या ९ आणि एसडीआरएफच्या ४ अशा एकूण १३ टीम सज्ज ठेवण्यात आल्या आहेत.

राज्यातील संपूर्ण कोकणसह, अमरावती विभागातील काही तालुक्यांमध्ये जोरदार पाऊस होत आहे. त्यामुळे काही ठिकाणी पूरजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. तसेच काही ठिकाणी नदीच्या पातळीत होणारी वाढ लक्षात घेऊन खबरदारीचा उपाय म्हणून स्थानिक पातळीवर उपाय योजना करण्यात येत आहेत. तसेच आवश्यक ठिकाणी राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती व्यवस्थापन दलाच्या टीम तैनात आहेत.

आज दुपारी १२ वाजेपर्यंत कोकण विभागातील पालघर जिल्ह्यात गेल्या २४ तासात सरासरी १०० मिमी. पेक्षा जास्त पाऊस झाला आहे. जिल्ह्यात पावसाचा जोर वाढत असून हवामान विभागाकडून अतिवृष्टीची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मुंबईत गेल्या २४ तासात मुंबई कुलाबा येथे ११७ मिमी तर सांताक्रूझ येथे १२४ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात सद्यस्थितीत पूर परिस्थिती नाही. मात्र जिल्ह्यातील २ नद्या इशारा पातळीच्या वर वाहत असून जिल्हा प्रशासन सतर्क आहे. तसेच वारंवार दरड कोसळण्याच्या घटना घडत असल्याने सुरक्षेच्या कारणास्तव मुंबई–गोवा महामार्गावरील परशुराम घाट वाहतुकीकरिता बंद करण्यात आला असून वाहतूक अन्य मार्गाने वळवण्यात आली आहे. पुणे विभागातील कोल्हापूर जिल्ह्यात सद्यस्थितीत पूर परिस्थिती नाही, मात्र नद्यांच्या पाणी पातळीत वाढ होत असल्याने एनडीआरएफच्या दोन तुकड्या तैनात करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्यातील चांदूरबाजार आणि मोर्शी येथे पूरजन्य परिस्थिती निर्माण झालेली असून गावातील लोकांना सुरक्षित स्थळी नेण्याचे काम सुरु असून, सद्यस्थितीत जिल्ह्यात स्थानिक बचाव पथके कार्यरत आहेत.



# दासगावमध्ये संरक्षण भिंत कोसळली



**दै.रायगड नगरी । महाड**

दोन दिवस पडणाऱ्या पावसामुळे महाड शहर आणि परिसरामध्ये जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. मंगळवारी (दि.५) सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास तालुक्यातील दासगाव भोई वाड्यातील अर्जुन अप्पा पड्याल यांच्या घरावर भिंतीचा कठडा कोसळल्याने घराचे नुकसान झाले. या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. या घटनेमुळे दासगाव परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून या घटनेची पाहणी भाजपचे नेते प्रवीण दरेकर यांनी केली व संबंधित अधिकार्यांना योग्य त्या सूचना दिल्या.

दासगाव भोई वड्यामध्ये १६८ घरे आहेत तर एक हजार लोकांची वस्ती आहे. सोमवारी महाड तालुक्याला पावसाने झोडपून काढल्यानंतर मंगळवारी देखील पाऊसाची संततधार सुरूच होती. महाड शहर, दासगाव परिसरात अचानक पुरस्थिती निर्माण होऊन संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सरकारी यंत्रणा सज्ज झाली असता मंगळवारी दासगाव भोई वाड्यात अचानक रहदारीचा रस्ता खचून बाजूला बांधण्यात आलेली संरक्षण भिंत एका घरावर सकाळी ४ वाजण्याच्या सुमारास कोसळली. त्यावेळी घरामध्ये ३ लोकांचे एक कुटुंब राहत होते. सुदैवाने कुटुंबातील कोणालाही दुखापत झाली नाही.

२००५ मध्ये महाड तालुक्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टि होऊन सुमारे १९० लोकांना जीव गमवावा लागला होता. यामध्ये दासगाव गावची मोठी हानी झाली होती. याच भोईवाड्यामध्ये दरड कोसळून ४८ लोक मरण पावले होते. त्या वेळेपासून दरवर्षी महसुल विभागामार्फत या ठिकाणच्या लोकांना पावसाळ्यापुर्वी स्थलांतराच्या नोटिसा देण्यात येतात. यावर्षी देखील अशाच प्रकारे नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.

आमदार प्रवीण दरेकर यांनी दासगावची पाहणी केली असता या ठिकाणी कोणती उपाययोजना करावी लागेल, या ठिकाणच्या लोकांना कशाप्रकारे सुरक्षा

.../२

# पावसात उरणची बत्ती गुल

## ट्रान्सफॉर्मर जळाला विद्युत वाहक तार तुटूली

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण येथील महावितरण कार्यालयाचे उप अभियंता यांनी पावसाळ्यापूर्वी ट्रान्सफॉर्मर व विद्युत वाहक तारा, लोखंडी पोल यांची मेंटेनन्सची कामे उरकून न घेतल्याने अनेक भागात ट्रान्सफॉर्मर जळणे, विद्युत वाहक तारा तुटून पडणे, लोखंडी पोल पडणे या सारख्या घटनेत वाढ झाली आहे. त्यामुळे रात्री अपरात्री विद्युत पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. महावितरण विभागाच्या वरिष्ठ अभियंता यांनी या घटनेची खबरदारी घेतली नाही. अशा दुर्घटनेमुळे रहिवाशांना अपघाताला सामोरे जावे लागून जीव ही गमवावे लागणार अशी भिंती रहिवाशी व्यक्त करत आहेत.

उरण तालुक्यात पावसाचा जोर वाढला आहे. त्यामुळे शेतकरी शेतीच्या कामात गर्क झाला आहे. अशा शेतकऱ्यांना निवांत क्षण मिळाला यासाठी शेतकरी आप आपल्या घरी गेल्यावर घरातील विद्युत पुरवठा खंडित झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. त्यातच चाणजे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीत ट्रान्सफॉर्मर जळण्याची दुदैवी घटना घडली. तसेच खोपटा बस स्थानकाजवळ विद्युत वाहक तार तुटूल्याची दुदैवी घटना घडली. या घटनेत जीवित किंवा विकत हानी झाली नसली तरी गावो गावचा विद्युत पुरवठा खंडित झाला.

अशा घटना संदर्भात महावितरण कार्यालयाकडे विचारणा केली असता येथील अभियंता हे त्यांच्या तोऱ्यात राहून उत्तरे देण्यास टाळाटाळ करीत आहेत. त्यामुळे उरण तालुक्यात वारंवार घडणाऱ्या अशा घटनांचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्याचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच महावितरण कंपनीचे वरिष्ठ अभियंता यांनी जातीने लक्ष केंद्रित करावे अशी मागणी चाणजे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील सामाजिक कार्यकर्ते सचिन डाऊर यांनी केली आहे.



# महापालिकेच्यावतीने कोरोनाकाळात पालक गमावलेल्या बालकांना अर्थसहाय्य

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिका महिला व बालकल्याण विभागातर्फे महापालिका क्षेत्रातील कोरोना संसर्गामुळे एक पालक किंवा दोन पालक गमावलेल्या बालकांना प्रत्येकी ५० हजाराचे अर्थसहाय्य वाटप करण्याचा कार्यक्रम आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल, आयुक्त गणेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपमहापौर सीताताई पाटील, महिला बालकल्याण समिती सभापती हर्षदा उपाध्याय, महिला बालकल्याण समितीच्या सदस्या, प्रभाग समिती सभापती व नगरसेवक यांच्या उपस्थितीत झाला.



कोरोना काळात अनेक बालकांच्या पालकांचे आकस्मात मृत्यू झाले. वय वर्षे २१ वर्षाखालील जी मुले अनाथ झाली अशा अविवाहित मुलांमुलींना आर्थिक मदत देऊन त्यांच्या दु:खाचा भार हलका करावा या उद्देशाने महापालिकेने महिला बालकल्याण समितीच्या सभापती मोनिका महानवर यांच्या काळात हा ठराव महासभेत मंजूर करण्यात आला होता.

त्याप्रमाणे पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील आज एकुण १२८ बालकांना मुदत ठेवीच्या स्वरूपात अर्थसहाय्याचे वाटप करण्यात आले. उर्वरित लाभार्थ्यांना त्याच्या वेळेच्या उपलब्धीनुसार मदतीचे धनादेश देण्यात येणार आहेत. कोरोना काळात ज्या बालकांचे

.../२

# उसर हायस्कूलमध्ये अज्ञात चोरट्यांनी मारला डल्ला



**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यातील अभिनव ज्ञान मंदिर उसर खुर्द हायस्कूल मध्ये अज्ञात चोरट्यांनी शाळा बंद असल्याचा फायदा घेऊन जवळपास एक ते सव्वा लाख रू. मुद्दे मालावर हात साफ करून पोबारा केला.

याबाबत पोलीस सुत्राकडून मिळालेल्या माहिती नुसार वरील तारखेला अज्ञात चोरट्यांनी संधी साधुन हायस्कूल मधील ९ वी च्या वर्गाचे दरवाजाची कुलुप तोडून बॅंटरी रूम च्या कडी कोयंडा तोडून शाळेच्या दोन्ही रूम मध्ये प्रवेश करून वस्तू काढल्या. तसेच शाळेच्या आवारात असलेल्या चार सोलर प्लेटस १५०००/–रू किमतीचा हायर कंपनी चा स्मार्ट टीव्ही, ल्युमिनस कंपनीच्या १० बॅटऱ्या रू ८००००/–, ल्युमिनस कंपनीच्या ४सोलर प्लेट स रू.२००००/–असा जवळपास अंदाजे सव्वा लाख रू किमतीचा मुद्दे माल घरफोडी करून चोरीस गेल्याची घटना घडली अशी माहिती फिर्यादी मुख्याध्यापिका अंजली धारसे यांनी दिली असून गु.र.नं. ६१/ २०२२ भा.द.वि.क. ३५४, ३५७, ३८० नोंद करण्यात आली आहे. दरम्यान उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविण पाटील तळा पोलीस निरीक्षक गोविंद ओमासे यांनी भेट देऊन पहाणी केली. पुढील तपास उपपोलिस निरीक्षक शिवराज खराडे व सहकारी करीत आहेत.

# स्कूल व्हॅनने घेतला अचानक पेट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गाडी मध्ये सी एन जी गॅस भरून पेट्रोल पंपाच्या बाहेर पडून काही अंतर पुढे गेलेल्या स्कूल व्हॅन ने अचानकपणे पेट घेतल्याने परिसरात धावपळ उडाली. सदर घटना आज दुपारी घडली आहे.

नवीन पनवेल उड्डाण पुला खाली असलेल्या कांडपिळे सी एन जी पंपामध्ये आज दुपारी पाऊणे तीन च्या सुमारास स्कूल व्हॅन क्रमांक एम एच ४६ जे ०३०१ ही गाडी घेऊन चालक गॅस भरण्यासाठी गेला व त्या नंतर सदर गाडी बाहेर काढून चालक थोडा पुढे गेला असता अचानक पणे गाडी ने पेट घेतला या वेळी परिसरातील नागरिकांनी सदर ठिकाणी धाव घेऊन आग्निशमक दलाला घटना स्थळी प्राचारण केले व त्यांनी आग आटोक्यात आणली. या लागलेल्या आगी मध्ये गाडी चे मोठे नुकसान झाले आहे. आग कशा मुळे लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही आहे.




# पावसाळी पर्यटन ठिकाणी १० पोलीस अधिकारी आणि १९ अंमलदारांचा राहणार बंदोबस्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पावसाळ्याच्या दिवसात पर्यटकांची मोठी रांग पनवेल तालुक्यातील परिसरातील गाढेश्वर धरण, माची प्रबळ, मोरबे धरण कुंडी धबधबा, शांतीवन नदीपात्र, गाढी नदीकडे लागते. त्यामुळे यावर्षी १० पोलीस अधिकारी आणि १९ अंमलदारांचा बंदोबस्त राहणर असल्याची माहिती पनवेल तालुका पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांनी दिली आहे. गाढेश्वर धरण, गाढेश्वर मंदिरच्या बाजूला, वाजे फाटा, कुंडी धबधबा टी पॉईंट, माची प्रबळ पायथा, वारदोली धबधबा, पोयंजे नानई बेकरीजवळ, मोरबे धरण आदि ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

माथेरान परिसरात पाऊस जास्त पडतो. व गाढी नदीला अचानक पूर येतो. त्यामुळे अनेकदा पर्यटकांचा या पाण्यात बुडून मृत्यू झालेला आहे. गाढी नदी ही खडकाळ आहे. त्यामुळे यावर डोके आपटून व जखमी होऊन पर्यटकांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत. पावसाचे दिवस असल्याने तालुक्यातील गाढेश्वर धरण परिसर

.../२



धबधबे, धरण परिसरात पोलीस तैनात करण्यात आले असून धबधब्याजवळ पर्यटक पोहोचू शकतील अशा सर्व मार्गांवर पोलीस लक्ष ठेवून आहे. जर कोणी पोलिसांना चकवा देण्याचा प्रयत्न केल्यास त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**-शिवराज पाटील, पोलीस उपायुक्त, परिमंडळ- २,नवी मुंबई**

पर्यटकानी पावसाळी पर्यटन ठिकाणी येऊ नये, परिसरातील बंगले मालक,फार्म हाऊस मालक यांच्याकड़े येणारे पाहूणे नदीच्या पात्रात गेले नाही पाहिजेत. त्यांची जबाबदारी मालकाची राहील. त्यांना नदीच्या पात्रात जाण्यास मज्जाव केला पाहिजे. तसेच कोणताही अनुचित प्रकार घडला तर बंगले आणि फार्म हाऊस मालक जबाबदार असतील.

**-रवींद्र दौंडकर-वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पनवेल तालुका पोलीस ठाणे**

# उरण शिक्षण विभागाच्या कार्यालयाला गळती ; शॉर्ट सर्किटमुळे कर्मचाऱ्यांच्या जीवितास धोका

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील शिक्षण विभागाच्या इमारतीच्या छतातून पावसाचे पाणी झिरपत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. पावसाच्या पाण्यामुळे भिंती ओल्या झाल्याने इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, संगणक यांना शॉंक लागत आहे. त्यामुळे कार्यालयातील कर्मचारी आपला जीव मुठीत घेऊन काम काज करत आहेत. तरी कार्यालयात एखादी दुदैवी घटना घडण्याची तसेच महत्वाची कागद पत्रे भिजण्याची वाट न पाहता रायगड जिल्हा परिषदेने तात्काळ इमारतीची दुरुस्ती करण्याचे काम हाती घ्यावे अशी मागणी चक्क शिक्षक, कर्मचारी वर्ग करीत आहेत.



राज्याची, देशाची सुसंस्कृत आणि अभ्यासू नवी पिढी घडविण्याचे काम हे त्या त्या ठिकाणा वरील शिक्षण विभाग हे करत असतात. परंतु आज अशा शिक्षण विभागाला अनेक समस्यांनी ग्रासले आहे. उरण पंचायत समितीच्या अखत्यारीत असलेल्या शिक्षण विभाग ही त्याला अपवाद नाही. २००२ ते ०३ या वर्षात केंद्र व राज्य सरकारने सर्व शिक्षण अभियानांतर्गत उरण पंचायत समितीच्या आवारात

.../२

# महाड तालुक्यातील बावळे गाव परिसरातील जमिनीला पडलेल्या भेगेची भूवैज्ञानिकांनी केली पाहणी

## प्राथमिक तपासांती कोणताही धोका नसल्याची माहिती

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यात बावळे येथे पावसामुळे येथील परिसरात भेग पडल्याचे निदर्शनास आले होते. जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या निर्देशानुसार वरिष्ठ भूवैज्ञानिक श्री.हनुमंत संगनोर, वरिष्ठ भूवैज्ञानिक तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी श्री.रोशन मेश्राम यांच्यासह प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड, तहसिलदार सुरेश काशिद यांनी या गावपरिसराला भेट देऊन तेथील जमिनीला पडलेल्या भेगेची तातडीने पाहणी केली.

महाड तालुक्यातील बावळे या गावपरिसरातील जमिनीला पडलेली ही भेग उत्तर–दक्षिण असून त्याची लांबी सुमारे १५ ते २० मीटर एवढी आहे.

.../२



# एकनाथी रामायण!

महाराष्ट्राला बऱ्याच वर्षांनी ऐसपैस आणि रांगड्या भाषेत थेट बोलणारे मुख्यमंत्री लाभले. दिवंगत वसंतदादा पाटील हे मुख्यमंत्री असताना असे थेट बोलत. अजित पवार मुख्यमंत्री झाले असते तर तेही असे बोलले असते. मात्र, एका भाषणातल्या रिकाम्या धरणांचा फटका बसल्यापासून ते अतिसावध झाले आहेत. प्रत्येक नावापुढे दरवेळी 'साहेब' हे पालुपद लावण्याची अत्यंत कृत्रिम प्रथा विधिमंडळात बोकाळली असून तिला अजित पवारांसहित सगळे नेते बळी पडले आहेत. या पार्श्वभूमीवर नवे आणि ताज्या दमाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जी चौफेर, मनसोक्त, मार्मिक टोलेबाजी केली; ती त्यांचे आजवरचे अप्रकाशित रूप दाखविणारी होती. रविवारी विधानसभेच्या अध्यक्षांची निवड सहजसोपी ठरल्याने विश्वास ठराव ही औपचारिकता होती. ती पार पडली. या ठरावावर एकेक खंदे, आक्रमक आणि अनुभवी वक्ते बोलल्यानंतर मुख्यमंत्री काय व कसे बोलतात, याची साऱ्यांना उत्सुकता होती. त्यातच एकनाथ शिंदे हे कमी बोलतात आणि इतरांचे ऐकतानाही शक्यतो चेहरा निर्विकार ठेवतात. असे असताना ठरावावरील आभाराच्या भाषणाने शिंदे यांनी आधीची सगळी भाषणे पुरती निष्प्रभ करून टाकली. शिवसेनेतले सर्वांत मोठे बंड सर्वांत यशस्वी करणारे एकनाथ शिंदे बंडाच्या हालचालींचा 'काही तपशील सांगायचा आणि काही आवरता घ्यायचा' असे करत बऱ्याच गोष्टी मोकळेपणाने सांगत होते. त्यांचे शेजारी देवेंद्र फडणवीस यांना आता 'हे सगळेच सांगून टाकतात की काय...' अशी चिंता पडत होती. मात्र, सभागृहाला विश्वासात घेण्याची, बंडामागची भूमिका समजावून देण्याची आणि जागच्या जागी विविध पक्षांच्या सदस्यांची साक्ष काढण्याची अशी बिनधास्त, अनौपचारिक शैली सभागृहाने बऱ्याच वर्षांत पाहिली नव्हती. त्यामुळेच, वरवर विस्कळित वाटणारे त्यांचे भाषण आतून येत होते. कोंडलेल्या वाफेला दीर्घकाळाने वाट मिळावी, तसे ते बाहेर ओसंडत होते आणि त्याचवेळी, ते 'माझे दरवाजे सर्वांसाठी २४ तास उघडे आहेत' असे सांगून सर्वांना आश्वस्त करीत होते. काही सदस्यांनी उगाच राणा भीमदेवी थाट चढवून अनावश्यक आक्रस्ताळी भाषणे केली. त्यांची आवश्यकता नव्हती. या उलट, सभागृहाच्या बाहेर आदित्य ठाकरे यांनी पोक्तपणा दाखवून अचानक समोर आलेल्या बंडखोर आमदार प्रकाश सुर्वे यांच्याशी हस्तांदोलन करून 'त्या दिवशी आपल्याला एकत्र जेवायचे होते. पण तुम्ही असे कराल असे वाटले नव्हते,' असे म्हणत नाराजीला वाट दिली पण संवादाचा मार्ग बंद केला नाही. मात्र, सभागृहात ठाकरे गटाचे भास्करराव जाधव यांचा आवेश अतिनाट्यमय होता. एकीकडे, सत्तांतराची आणि विश्वास ठरावाची लगबग चालू असली तरी महाराष्ट्रात पुरेसा पाऊस झालेला नाही आणि मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री या दोघांनीही तातडीने आपत्ती व्यवस्थापनाची बैठक घ्यावी, ही काँग्रेसचे गटनेते बाळासाहेब थोरात यांची सूचना अधिक वास्तववादी होती. विरोधी पक्षनेतेपदी निवड झाल्यानंतरच्या भाषणात अजित पवार यांनाही ती उचलून धरावी लागली. विधान परिषदेचे मतदान झाले त्या रात्रीपासून महाराष्ट्रातील कारभार जवळपास ठप्प आहे. याला आता दोन आठवडे झाले. पावसाच्या काही बातम्या येत असल्या तरी अनेक ठिकाणी दुबार पेरणीचे संकट आ वासून उभे आहे. अनेक छोट्या-मोठ्या शहरांचा पाणीपुरवठा कमी करावा लागत आहे. विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन आता होईल, तेव्हा होईल. मात्र, राज्य सरकारने आता किंचितही वेळ दवडू नये. मुख्य म्हणजे, वेळप्रसंगी रात्रभर बसून मंत्र्यांची नावे ठरवावीत आणि त्वरित शपथविधी करून टाकावा. मंत्रिमंडळ कामाला लागायला हवे. झाला हाच विलंब खूप झाला. मुख्यमंत्र्यांनी जे विस्तृत भाषण केले त्यात बंडाचे कथानक तर होतेच; पण त्या पलीकडचे काही मूलभूत मुद्दे होते. त्यातला एक विचारसरणीचा होता. जुन्या सरकारमध्ये आपल्या हिंदुत्वाची कोंडी होत होती, हे ते स्पष्ट म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उघडपणे 'आता शंभर आमदार निवडून आणू व आमचा मुख्यमंत्री करू' असे म्हणत असल्याचा दाखला त्यांनी दिला. याशिवाय, आमदार व सामान्य कार्यकर्त्यांची कामे होत नव्हती, ही बरेच महिने आधी दबक्या आवाजात व नंतर खुलेपणाने होणारी चर्चा त्यांनी सभागृहात थेट मांडली. यातून, सरकार कुणाचेही असले तरी सूडबाजी न होता लोकाभिमुख कारभार कसा व्हायला हवा, हेच सूत्र अधोरेखित होत होते. आता नवे सरकार असे काम करेल का, हा प्रश्न आहे. आज मुख्यमंत्र्यांनी बंडखोरी आणि त्या आधीच्या 'एकनाथी रामायणा'तील काही अध्याय उलगडले. काही राखून ठेवले. मात्र, त्यांचे दिलखुलास बोलणे जसे महाराष्ट्राला आवडेल; तसेच, अहोरात्र काम करण्याचे आणि थेट आदेश देण्याचे रूपही महाराष्ट्राला पाहायचे आहे. सत्तांतराचे चर्वितचर्वण आता पुरे. ही वेळ सरकार आणि प्रशासनाने जोमाने कामाला भिडण्याची आहे. त्यासाठी विश्वासमत जिंकलेल्या शिंदे-फडणवीस सरकारला शुभेच्छा!

# वरसे सरपंच नरेश पाटील यांच्या वतीने दिव्यांग विद्यार्थीनीला मदतीचा हात

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा तालुक्यातील सहयोग अपंग (दिव्यांग )कल्याणकारी संस्थेच्या माध्यमातून वरसे ग्राम पंचायत सरपंच नरेश पाटील यांच्याकडील प्रयत्नपूर्वक सातत्याच्या मागणी नुसार तीन चाकी सायकल इ. १० वीमध्ये शिकत असलेल्या दिव्यांग विद्यार्थीनी शांती राम शेखर यादव हिला भेट देण्यात आली..



आपल्या न्याय हक्कासाठी शासन स्तरावर तसेच विविध सामाजिक क्षेत्रातील दानशूर व उदार व्यक्तींच्या महत्त्वपूर्ण सहकार्य व बहुमूल्य योगदानातुन सहयोग अपंग (दिव्यांग )कल्याणकारी संस्था प्रयत्नपूर्वक सातत्याने पाठपुरवठा करीत संस्थेच्या माध्यमातून १० वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या कु. शांती रामशेखर यादव रा.वरसे या दिव्यांग विद्यार्थिनीस वरसे ग्राम पंचायतीचे सरपंच नरेश पाटील यांनी लाभार्थी विद्यार्थिनीची गरज व अडचण लक्षामध्ये घेत तत्परतेने सहयोगी अपंग कल्याणकारी संघटनेच्या मागणी वजा विनंतीस मान देत त्यांनी तीन चाकी सायकल भेट दिली आहे.

याप्रसंगी आदर्श शिक्षक नंदकुमार मरवडे, केशव म्हस्के, सहयोग अपंग (दिव्यांग )कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष राजेश कांबळे, उपाध्यक्ष नंदलाल गुप्ता, सचिव रमेश खराडे, खजिनदार संजय गौतम टि. टी. किरण मोहिते, सह खजिनदार निवृत्ती सुर्वे, चंद्रकांत संसारे, सुरेश शेडगे, सुनिल दळवी, स्मिता विजय गजमल, जयश्री पुजारी, वैशाली पवार, सुवर्णा मांगले आदींच्या उपस्थितीमध्ये लाभार्थी कु.शांती रामशेखर यादव रा.वरसे हिला तिन चाकी सायकल भेट देण्यात आली.

सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रंचालन उपाध्यक्ष नंदलाल गुप्ता, सचिव रमेश खराडे यांनी केले तर पत्रकार नंदकुमार मरवडे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की सरपंच नरेश पाटील यांनी दिलेल्या योगदानाचे कौतुक व प्रशंसा करीत कोणतीही व्यक्ती ही अपंग नसतेच तर समाजमनाच्या मानसिकतेवर अवलंबून असते दृष्टी बदल्यास सृष्टी निश्चितच बदलेल समाजाची मानसिकता बदलणे काळाची गरज आहे भविष्यामध्ये संस्थेच्या कार्याकरीता सकारात्मक सहकार्य करण्याचे आश्वासन देत असे मोलाचे मार्गदर्शन केले शेवटी नंदलाल गुप्ता यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करणयात आली.

# आषाढी एकादशी निमित्ताने मांडला येथील विठ्ठल मंदिरात विविध कार्यक्रम : भजनाचे डबल बारी सामने

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

रविवार दि.१० जुलै रोजी आषाढी एकादशी निमित्ताने मुरुड तालुक्यातील मांडला येथील विठ्ठल मंदिरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून यादिवशी भाविकांच्या मनोरंजनात्मक भजनाचे डबल बारी सामने आकर्षण ठरणार असून गेल्या अनेक वर्षांपासून मरुदेवी प्रासादिक भजन मंडळातर्फे आयोजित करण्यात येत असून स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले जात आहे.



तालुक्यातील बोर्ली -मांडला पंचक्रोशीतील मांडला येथील मरुदेवी प्रासादिक भजन मंडळातर्फे गेल्या अनेक वर्षांपासून विविध ठिकाणी आयोजित करण्यात येत असलेल्या कार्यक्रमात बुवा बाळाराम पाटील, बुवा सुनील पालवणकर, नांदगावचे बुवा विद्याधर चोरघे,सागर राऊत, मनोहर भाईलकर यांचे सुश्राव्य बहारदार भजनाचे डबल बारी सामने पंचक्रोशीतील भाविक रसिक जनांचे आकर्षण ठरत आहे !

श्री गणेशोत्सव असो, आषाढी कार्तिकी एकादशी असो समर्थ प्रासादिक भजनी मंडळ यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाप्रसंगी रसिक जनांची मोठ्या प्रमाणात दाद मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

तालुक्यातील तमाम भाविक रसिक जनांनी लाभ घेतला आहे.सण उत्सव विविध धार्मिक कार्यक्रमातून सादर करण्यात येणारे सुश्राव्य बहारदार भजनाचे डबल बारी सामने भाविक रसिक जनांचे आकर्षण ठरत आहेत.

# सत्कार समारंभाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविण्यास मदत : फजल हळदे

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

मार्च २०२२ मध्ये झालेल्या दहावी आणि बारावी परीक्षेत तालुक्यातून प्रथम तीन क्रमांक मिळविलेल्या म्हसळा तालुक्यातील विद्यार्थ्यांचा सत्कार अंजुमन -ई -इस्लाम शिक्षण संस्था मुरुड यांच्या विद्यमाने म्हसळा येथील घनसार कोम्प्लेक्स मधील सभागृहात संपन्न झाला.

संस्थेचे अध्यक्ष अहमद हुसैन इरफान शहा यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या सत्कार समारंभास हलका कमिटी चे चेअरमन फजल हळदे, स्थानिक स्कूल कमिटी चेअरमन नासिर मिठागरे, नगराध्यक्ष असल कादिरी, उपनगराध्यक्ष सुनिल शेडगे, समीर इस्माईल उकये, भाई दफेदार, मुस्लिम समाज अध्यक्ष नाजीम चोगले, शकूर घनसार, अशफाक खमकर, संस्थेचे सचिव हिबजूरहमान नजिरी, डॉ. शेख अ. अजीज काजी, मुसदिक इनामदार, प्राचार्य मोहंमद तांबे, बशीर उलडे, साजिद हुरजूक, डॉ. मुबशीर जमादार, मुरुड विद्यालयाचे प्राचार्य गोठेकर, मतीन फणसे, शौकत घरटकर आदि मान्यवर उपस्थित होते.सालाबादप्रमाणे अंजुमन संस्थातर्फे तालुक्यातील दहावी, बारावी मध्ये प्रथम तीन क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना गुच्छ, प्रमाणपत्र आणि स्मृती चिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येते. या वेळी अनेक मान्यवरांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून शाळेतील शिक्षक आणि प्रचार्याना खऱ्या अर्थाने धन्यवाद दिले.

प्राचार्य मोहंमद तांबे यांच्या कन्येला कर्नाटक मध्ये ९९% गुण मिळाल्याने अंजुमन संस्थेतर्फे तिचे विशेष कौतुक करण्यात आले. या प्रसंगी बोलताना हलका कमिटी चे अध्यक्ष फजल हळदे यांनी सांगितले कि शाळेचा निकाल दरवर्षी १००% लागतो, हि सर्व शिक्षकांची मेहनत असून या यशाचे सर्व श्रेय शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांचे असून आम्ही सर्व कमिट्या चे पदाधिकारी त्यांना सातत्याने मार्गदर्शन करतो. शिक्षण प्रेमी ग्रामस्थ नेहमीच शाळेच्या शैक्षणिक गर्जा पूर्ण करण्यासाठी अग्रेसर असतात. नुकतेच म्हसळ्यातील एक तरुण समीर इस्माईल उकये सध्या तो लंडन येथे नोकरी निमित्त असून त्यांच्या माध्यमातून शाळेसाठी अद्यावत अशी शौचालये बांधून दिली, त्याच प्रमाणे समीर इनामदार यांनीही शाळेसाठी वॉटर फिल्टर बसऊन दिली आणि शाळेच्या प्रगतीसाठी सहकार्य केले. याही पुढे शाळेचा शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी आम्ही प्रयत्नात राहू असे आवाहन त्यांनी करताना विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी येणाऱ्या अडचणी सोडविण्याचा निश्चितपणे प्रयत्न करू असे आश्वासन फजल हळदे यांनी देऊन अश्या प्रकारे सत्कार समारंभाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविले पाहिजे असेही फजल हळदे यांनी सांगितले. अ. रहमान घराडे यांनी सूत्रसंचालन केले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## दासगावमध्ये संरक्षण भिंत कोसळली

देता येईल, याबाबत महाडचे तहसीलदार सुरेश काशीद यांच्यासोबत चर्चा केली. त्याचबरोबर २००५ च्या दासगावमध्ये आलेल्या दरडीमध्ये दिनेश नथुराम उकीर्डे यांचा मुलगा मयत झाला. मात्र दिनेश यांना आज रहाण्यासाठी घर नाही. त्यांना खास बाब म्हणून जिल्हाधिकार्यांकडे चर्चा करुन जागा देण्याचे आश्वासन देखील दरेकर यांनी यावेळी दिले.

## महापालिकेच्यावतीने कोरोनाकाळात पालक गमावलेल्या बालकांना अर्थसहाय्य

एक किंवा दोन पालक गमावले त्यांना महापालिकेच्यावतीने आर्थिक मदत करण्याच्या दृष्टीने भरीव रकमेची तरतूद करण्यात आली आहे. महिला बालकल्याण सभापती हर्षदा उपाध्याय यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. महापौरांनीही त्यांच्या मनोगतामध्ये महापालिका उपस्थित सर्वांच्या दु:खामध्ये सामिल असून त्यांचे दु:ख हलके करण्याच्या दृष्टीने ही मदत केली असल्याचे सांगितले. यावेळी आयुक्त श्री. गणेश देशमुख म्हणाले, ही मदत बालकांच्या भविष्यासाठी केलेली एक तरतूद आहे. महिला बालकल्याण समितीने कोरोना काळात पालक गमावलेल्यांना आर्थिक मदत देण्याची संकल्पना मांडली. या मदतीच्या रूपातून महापालिका या बालकांना नवी उमेद देत असल्याचे सांगितले.

महापालिका क्षेत्रातील अजूनही कोरोना काळात एक किंवा दोन पालक गमावलेल्या बालकांना आर्थिक मदत मिळाली नाही त्यांनी पालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन महिला बालकल्याण सभापती हर्षदा उपाध्याय यांनी केले आहे. यावेळी पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील एक किंवा दोन पालक गमावलेले मुले-मुली, त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच पालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## १० पोलीस अधिकारी आणि १९ अंमलदारांचा राहणार बंदोबस्त

पर्यटकांना खुणावत आहे. दरवर्षी पावसाळ्यात धरण परिसरात एका- दुसऱ्याचा मृत्यू होतो. पोलीस सर्वांना सावधानतेचा इशारा देतात. मात्र याकडे पर्यटक कानाडोळा करतात. त्यामुळे पोलिसांनी या ही वर्षी धरण परिसरात जाण्यास बंदी घातलेली आहे. पावसाळा नुकताच सुरु झाल्याने धरणाच्या परिसरात पाणी शिल्लक नाही त्यामुळे पर्यटकांची सध्या वर्दळ कमी आहे. निसर्गाचे सान्निध्य, हिरवाई, चारही बाजूंनी डोंगराच्या रांगा, त्यामध्ये धरणातून धबधब्यासारखे पडणारे पाणी यामुळे हजारो पर्यटक धरण परिसरात आकर्षक होतात. याच ठिकाणी मद्यपान करतात. त्यामुळे या पाहण्याचा मोह आवरत नसल्याने पर्यटक पाण्यात उतरतात. पाण्याचा अंदाज न आल्यामुळे एखाद दुसऱ्याला आपला जीव येथे गमवावा लागतो. जनतेच्या जीवाची आणि सुरक्षिततेसाठी जबाबदारी लक्षात घेऊन पोलीस बंदोबस्त नेमण्यात येणार आहे मात्र तरी देखील अनेक पर्यटक चोरवाटा शोधून धरणाच्या आणि धबधबा परिसरात जातात.

## उरण शिक्षण विभागाच्या कार्यालयाला गळती

तालुका शिक्षण विभागासाठी स्वतंत्र इमारत बांधण्याचे काम हाती घेतले.परंतु संबंधित अधिकारी वर्गाच्या दुर्लक्षित पणामुळे बांधकामांचा ठेका घेणाऱ्या ठेकेदारांनी नित्कृष्ठ दर्जाचे बांधकाम केल्याने शिक्षण विभागाच्या इमारतीला अनेक समस्यांनी ग्रासले.

त्यात मागील काही वर्षांपासून सदर इमारतीच्या छताला पावसाळ्यात गळती लागून राहीली आहे. यावर्षी पावसाने उशीराने हजेरी लावली असली तरी पावसाचे पाणी इमारतीच्या छतातून कार्यालयात झिरपत आहे. त्यामुळे इलेक्ट्रॉनिक्स वस्तू व संगणक यांना हात लावला असता शॉंक लागण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे कर्मचारी वर्ग आप आपला जीव मुठीत घेऊन शासकीय काम काज करत आहेत. राज्य सरकारने, रायगड जिल्हा परिषदेने सदर इमारतीच्या छताला लागलेली गळती थांबविण्यासाठी पुढाकार घेतला नाही. तर कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो. तसेच शिक्षण विभागाची महत्वाची कागदपत्रे पाण्यात खराब होऊन संगणक नादुरुस्त होऊ शकतात अशी भिंती कार्यालयात ये-जा करणारे शिक्षक, कर्मचारी वर्ग व्यक्त करत आहेत.

## जमिनीला पडलेल्या भेगेची भूवैज्ञानिकांनी केली पाहणी


या भेगेची खोली दीड ते दोन फूट असून त्यात पाणी साठलेले आहे. या बाबीवरून ही भेग मातीमध्ये पाण्याचे प्रमाण वाढल्यामुळे पडलेली असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तथापि या भेगेबाबत सविस्तर अभ्यास करण्यासाठी भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभाग, पुणे यांना कळविण्यात आले आहे.

प्राथमिक पाहणी दरम्यान या भेगांमुळे कोणताही धोका संभवत नसून नागरिकांनी घाबरू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले असून या भेगेची दररोज दोन ते तीन वेळा पाहणी करून काही बदल असल्यास स्थानिक प्रशासनास त्वरित कळविण्याबाबत संबंधित सरपंच व गावकऱ्यांना सूचनाही देण्यात आल्या आहेत.

# मुरुड तालुक्यात जोरदार पाऊस : बोर्ली स्थानकावर पाणी साचले

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार राज्यात पावसाने दमदार हजेरी लावली असून पुढील पाच दिवस अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे.काल पासूनच मुरुड शहरासह तालुक्यात जोरदार पाऊस पडत असून सकाळ पासून जोरदार पावसामुळे बोर्ली-मांडला, नांदगाव-मजगांव पंचक्रोशीसह तालुक्यातील जनजीवन विस्कळित झाले आहे.



मुरुडमध्ये सलग चार दिवसांपासून चांगला पाऊस पडत आहे. गेल्या २४ तासांमध्ये मुरुड मध्ये ११६ मि. मि. पावसाची नोंद झाली आहे तर एकूण आतापर्यंत मुरुडमध्ये ८३९ मि. मि. पावसाची नोंद झाली आहे.

नांदगाव मजगांव,बोर्ली -मांडला परीसरात जोरदार पावसामुळे जनजीवन विस्कळित झाले तर बोर्ली स्थानकावर पाणी साचल्याने वाहतुकीत अडथळा निर्माण झाला होता.मुरुडमध्ये आजुबाजूच्या परिसरातील ग्रामीण भागातून तहसिल कार्यालय, पोलिस स्टेशन, सेतू, पंचायत समिती आदी.कार्यालयात विविध कामांसाठी आलेल्या नागरिकांना आपली कामे करण्यात जोरदार पावसामुळे परिणाम होत असल्याचे दिसून येत होते.

# यांत्रिकीकरणाच्या युगातही बैलांच्या नांगराचे महत्त्व अबाधित

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पावसाळा सुरू झाल्याने सध्या बळीराजा शेतीच्या कामात गुंतला आहे. यांत्रिकीकरणाच्या युगातही जिल्ह्यातील अनेक शेतकरी अजुनही शेतीच्या कामासाठी बैलांच्या नांगराला पसंती देत आहे. जमीनीत खोलवर जाणारा नांगराचा फाळ, छोट्या व तुकड्यांच्या शेतासाठी उपयुक्त आणि बैलाला देण्यात आलेले महत्व यामूळे अजुनही बहुतांश शेतकरी नांगराचा वापर करत आहेत. जिल्ह्यात यंदा ९५ हजार हेक्टरवर भात शेती केली जात आहे.

पावसाने हजेरी लावली आणि पेरणीसाठी जमीन नागंरणीला सुरुवात झाली. शिवाय आता भात रोपे तरारली असून लावणीची लगबग देखील सुरू झाली आहे. जिल्ह्यातील भात शेती हि तुकड्यामध्ये विभागली आहे. तसेच डोंगर उताराला लागून असलेली व दुर्गम आणि दुरच्या पल्ल्यातील शेती तसेच शेताभोवती असलेले बांध यामुळे तेथे ट्रॅक्टर नेणे व नांगरणी करणे गैरसोयीचे होते. मात्र नांगर व बैल कुठेही सहज नेले जाऊ शकतात. बैल नांगराचा फाळ जमिनीत खोलवर जाऊन जमीन अधिक भुसभूशीत करतो. त्यामूळे पेरणी करणे सोप्पे जाते. शेतात बैलाचे पाय पडणे हे अनेकांना शुभ वाटते. तसेच बैलाच्या पायामूळे तण व गवत मरतात यामुळे काही शेतकरी पेरणी व लावणीच्या दरम्यानच्या नांगरणीला बैलांच्या नांगराला पसंती देतात.

नांगरणी करणा-या शेतकर्यास किंवा मजुरांना नांगऱ्या म्हणतात. काही शेतकरी स्वतः आपल्या शेतात नांगरणी करतात. तर काही जण नांग-याला बोलवितात. एक बैलजोडी व नांगरासह नांग-याची मजूरी ७०० ते १००० रुपये प्रती दिवस आहे. जर पैसे नाही घेतले तर त्या बदल्यात नांगर-याकडे शेतीवर काम करण्यासाठी तीन-चार माणसे द्यावी लागतात. असा हा व्यवहार असतो. नांग-याला मजुरी बरोबरच एक वेळची न्याहरी, जेवण व दोन वेळेचा चहापाणी दयावे लागते. तरी देखील या नांग-याला खुप मागणी आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## ज्येष्ठ नागरिकांसाठी कोरोना काळात बंद केलेली तिकीट सवलत चालू करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जेष्ठ नागरिकांसाठी असलेली कोरोना काळात बंद केलेली तिकिट सवलत चालू करण्याची मागणी रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक व बांधकाम कामगार मजदूर युनियनने केंद्रीय रेल्वेमंत्री आणि रेल्वे राज्यमंत्री यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

मागील काही वर्षांपूर्वी देशावर उद्भवलेल्या कोरोना संसर्गजन्य महारोगामुळे बंद करण्यात आलेली ज्येष्ठ नागरिकांकरता रेल्वेच्या योजनेतून मिळणारे तिकिट सवलत बंद करण्यात आलेली आहे. ही सवलत पुन्हा सुरू करून ज्येष्ठ नागरिकांना आत्ताच्या महागाईच्या परिस्थितीला सामोरे जाऊन लवकरात लवकर सहकार्य करावे अशी विनंती रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक व बांधकाम कामगार मजदूर युनियनने केली आहे. तिकीट सवलत नसल्याने ज्येष्ठ नागरिकांना पूर्ण तिकिट काढून प्रवास करावा लागतो. तसे निवेदन सरचिटणीस विनायक गांधी यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आणि रेल्वे राज्यमंत्री यांना दिले आहे.

## कृषी विभागाच्या माध्यमातून जांभिवली येथे शेतकरी कॅम्प संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील ग्रामपंचायत जांभिवली येथे कृषी विभागाच्या माध्यमातून शेतकरी कॅम्प पार पडले. महाडीबीटी अंतर्गत एक अर्ज विविध योजना बाबत माहीती यावेळी शेतकऱ्यांना देण्यात आली. शेतकऱ्यांना बीज प्रक्रिया, बियाणे उगवण क्षमता चाचणी, मग्रारोहयो फळबाग लागवड फॉर्म भरून कागदपत्रे जमा करण्यात आली, हळद लागवडी बद्दल मार्गदर्शन, प्रधानमंत्री सुक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग, तसेच पीएम किसान योजना ई- केवायसी ३१ जुलै च्या आत करून घेण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. माती परीक्षण नमुना घेणे व त्याचे महत्त्व शेतकऱ्यांना यावेळी पटवून देण्यात आले. सदर कार्यक्रमाला जांभिवली येथील ग्रामस्थ शेतकरी बांधव उपस्थित होते, मौजे जांभिवली गावचे सरपंच रविंद्र कोंडिलकर यांच्या हस्ते बायोला व भाजीपाला मिनीकीट चे वाटप करण्यात आले.

# आ.भरत गोगावले यांच्या प्रयत्नांनी शासनाकडून आपत्ती निवारणासाठी दीड कोटींचा निधी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**



आपत्तीकाळात आपल्या घरावरील संकट आहे असे समजून योग्य नियोजन करून उपाययोजना कराव्यात. यासाठी सर्व शासकीय विभागप्रमुखांनी प्रांताधिकारी व तहसिलदार यांच्या सूचनेनुसार आपापसात योग्य समन्वय ठेवून अलर्ट मोडवर काम करावे, अशी सूचना जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी महाड येथील समन्वय बैठकीत केली.

महाड आणि पोलादपूर तालुका व शेजारील रत्नागिरी, सातारा आणि पुणे जिल्हे यांच्यात आपापसात आपत्ती व्यवस्थापन समन्वय साधण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या पुढाकारातून आमदार भरत गोगावले व आमदार प्रवीण दरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत महाड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकात आंतर जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन समन्वय बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश तांबे, तहसिलदार सुरेश काशिद व इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. महाड-पोलादपूर तालुक्यात पावसाळ्यात येणाऱ्या आपत्ती निवारणासाठी शासनाकडून आमदार भरत गोगावले यांच्या प्रयत्नातून दीड कोटी रुपयांचा निधी मिळणार असल्याची माहिती यावेळी जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर यांनी दिली. आमदार प्रवीण दरेकर यांनी आपत्ती निवारणासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांचे कौतुक करीत आपत्ती काळात शासनाकडून सर्वोतोपरी मदत केली जाईल, असे आश्वासन दिले. स्थानिक पा-तळीवरील रेस्क्यू टीम मजबूत करण्याचा प्रयत्न करा, त्यासाठी आवश्यक तो निधी शासन व सीएसआर फंडातून उपलब्ध करून दिला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

या समन्वय बैठकीच्या सुरुवातीस उपस्थित सर्व शासकीय विभागांकडून आपत्ती निवारणासाठी केलेल्या उपाययोजनांची सविस्तर माहिती जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर यांनी घेतली. उपस्थित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर यांनी आपत्ती काळात आपद्ग्रस्तांना तातडीने मदत पोहोचली जावी यासाठी महाड तालुक्यासाठी १४ सेफ हाऊस व पोलादपूर तालुक्यासाठी ०५ सेफ हाऊस उपलब्ध असतील असे सांगितले. वीज मंडळासह अन्य शासकीय विभागातील कर्मचाऱ्यांनी आपत्ती काळात केवळ आपल्या विभागाच्या कामापुरते मर्यादित न राहता प्रांताधिकारी श्रीमती पुदलवाड यांच्या सूचनेनुसार आवश्यकता भासेल अशी सर्व प्रकारची कामे करण्याची तयारी ठेवावी, असे निर्देश दिले. जिल्ह्यातील १६० कर्मचारी आपत्तीकाळात करावयाच्या कामांचे प्रशिक्षण ओरिसा येथून घेऊन आले आहेत, त्यापैकी ६० कर्मचारी महाड-पोलादपूर मधील असून त्यांनी इतर ४०० लोकांना प्रशिक्षित केले आहे. या प्रशिक्षित स्वयंसेवकांचा व त्यांनी घेतलेल्या प्रशिक्षणाचा लाभ येणाऱ्या काळात होईल, असा विश्वास जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर यांनी यावेळी व्यक्त केला.

# खांदेश्वर येथे रस्त्यावर पे अँड पार्क

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खांदेश्वर आणि मानसरोवर रेल्वे स्थानका समोर वाहनतळ आणि बस टर्मिनल्ससाठी राखीव असलेल्या भूखंडावर सिडकोने पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घरे बांधून सर्वांची फसवणूक केली आहे. याविरोधात कामोठे कॉलनी फोरमच्या वारंवार आवाज उठवूनही हा प्रकल्प रेटून नेण्यात आला.

वास्तविक पाहता नागरिकांच्या मनामध्ये कमालीचा असंतोष आहे. या इमारती उभारत असताना रेल्वे स्थानकावर येणाऱ्या दुचाकी व चारचाकी वाहनांना पार्किंगकरिता जागा राहिलेली नाही. त्यासाठी पर्यायी व्यवस्था केलेली नाही. त्यामुळे नाईलाजास्तव प्रवाशांना आपली वाहने रस्त्यावरच पार करावी लागतात. मात्र तेथेही सिडकोकडून खांदेश्वर रेल्वे स्थानकाच्या बाहेर पे अँड पार्क सुरू करून पैसे घेण्यास सुरुवात केली आहे. ही गोष्ट अत्यंत अन्यायकारक असून पंतप्रधान आवास योजना याठिकाणी लादण्यात आली आणि आता सर्वसामान्यांच्या प्रवाशांच्या माथी पे अँड पार्क मारण्यात आले.

येथील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी सिडकोकडून कोणतीही उपाययोजना करण्यात आलेली नाही. त्यातच अशाप्रकारे वसुली मात्र सुरू करण्यात आली आहे. तसेच मानसरोवर रेल्वे स्थानक परिसरात सुद्धा पार्किंगची जागा विकसित न करता पार्किंग शुल्क आकारले जात आहे. पार्किंग एरीयामधे मोठ्या प्रमाणात चिखल असल्यामुळे मोटरसायकल घसरून अपघात होत आहेत. तसेच लोकांना पार्किंग करत चिखलातून वाट तुडवत स्टेशनला जावे लागत आहे.

यासंदर्भात सिडको रेल्वे प्रकल्पाचे अधीक्षक अभियंता यांना कामोठे कॉलनी फोरमच्या वतीने पत्र देण्यात आले आहे. ही अत्यंत अन्यायकारक गोष्ट असून खांदेश्वर रेल्वे स्थानकाबाहेर रस्त्यावर सुरू केलेले पे अँड पार्क त्वरित बंद करावे अन्यथा आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल, असा इशारा दिला आहे. यावेळी कॉलोनी फोरमचे अध्यक्ष मंगेश अढाव, रंजना सडोलीकर, बापू साळुंखे, राहुल बुधे, अरुण जाधव अणि शुभांगी खरात उपस्थित होते.



## मनसे नेते अमित ठाकरे शनिवारी रोह्यात

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

रोहा तालुक्यातील महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या पुनर्बांधणीसाठी मनसे नेते अमित ठाकरे शनिवार दि. ९ जुलै रोजी रोहा नगरीत येणार असुन ज्येष्ठ नागरिक सभागृहामध्ये अमित ठाकरे दुपारी दोन वाजता मनसे कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत. तरी रोहा तालुक्यातील ज्या तरुण तरुणींना मनसे विद्यार्थी सेनेत काम करण्याची इच्छा आहे.



तसेच ज्या विद्यार्थ्यांना आपल्या कॉलेज मध्ये मनसे विद्यार्थी सेनेचे युनिट स्थापन करायचे आहे अशा विद्यार्थ्यांनी साईनाथ धुळे (मो. नं. ८४०७९२३१८४ ) व महाराष्ट्र नवनिर्माण महिला सेना रोहा तालुका अध्यक्षा दिपश्री घासे ( मो. नं. ९७६४०४३५४४ ) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन रोहा तालुका विद्यार्थी सेना अध्यक्ष व मनसे रोहा तालुका सचिव साईनाथ धुळे यांनी केले आहे. दरम्यान मनसे नेते अमित ठाकरे रोह्यात येणार असल्यामुळे तालुका मनसेमय होणार असल्याचा विश्वास साईनाथ धुळे यांनी व्यक्त केला आहे.

# शिक्षण समृद्ध जीवनाचा मार्ग : माधव पाटील



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिक्षणाला मानवी जीवनात अनन्य साधारण महत्व असून शिक्षण समृद्ध जी-वनाचा मार्ग आहे, त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने उच्च शिक्षणाची कास धरली पाहिजे, असे प्रतिपादन पनवेल तालुका पत्रकार विकास संस्थेचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील यांनी आज (दि. ०५) कष्टकरीनगर येथे केले.

पनवेल तालुका पत्रकार विकास संस्थेचे सल्लागार डॉ. संजय सोनावणे यांच्या वाढदिवसाचे औचित्याने जिल्हा परिषदेच्या कष्टकरीनगर शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. त्यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी डॉ. संजय सोनावणे, संस्थेचे सदस्य संजय कदम, विवेक पाटील, हरेश साठे, सुनिल राठोड, संकेत भोईर, तुराडे ग्रामपंचायतीचे माजी उप सरपंच विश्वनाथ गायकवाड, शिक्षिका अनिता वाघमारे, शर्मिला उपरे, शिक्षक अशोक नेटके आदी उपस्थित होते.

माधव पाटील यांनी पुढे बोलताना सांगितले कि, आधुनिक युगात सर्व क्षेत्रात स्पर्धा निर्माण झाल्या आहेत आणि विशेषत्वाने शिक्षणातही स्पर्धा अधोरेखित होत आहे. 'शिकला तो टिकला' हि फक्त म्हण नसून जीवनाची एक गुरुकिल्ली आहे. शिक्षण ही ज्ञान, कौशल्य, मुल्ये, विश्वास व सवयींच्या प्राप्तीची प्रक्रिया आहे.यातून जात असताना काही विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीनुसार शिक्षण मिळते, मात्र दुर्लक्षित विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळाले पाहिजे, या उद्दिष्टाने पनवेल तालुका पत्रकार विकास संस्थेच्या वतीने विधायक कार्य केले जाते. संस्थेच्या माध्यमातून अनेक शाळेत अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविले जात असून यापुढेही विद्यार्थ्यांच्या उत्कर्षासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

यावेळी डॉ. संजय सोनावणे यांनी बोलताना, दुर्गम भागात आयोजित केलेल्या कार्यक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले. शिक्षणाशिवाय पर्याय नाही, त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने सफल जीवनाचे उद्दिष्ट ठेवून शिक्षणाप्रती आस्था देवून कार्यरत रहावे, असे आवाहनही त्यांनी व्यक्त केले.

## ट्रक मधून खाली उतरलेला प्रवाशी बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुकयातील अजिवली येथे एका ट्रक मधून खाली उतरलेला प्रवाशी पुन्हा परत न आल्याने तो हरवल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

अनिल ओंमकार खर्ते (वय ३१) राहणार मडगाव, मध्यप्रदेश, उंची पाच फूट चार इंच, वर्ण गोरा, केस काळे, चेहरा लांब, बांधा सरपातळ असून डाव्या हातावर माँ असे गोंदलेले आहे. त्याच्या अंगात पांढऱ्या रंगाचा टीशर्ट व राखाडी रंगाची पॅन्ट घातलेली आहे. सदर इसमा बाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पो.हवा अमोल कांबळे यांच्याशी संपर्क साधावा.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना
**(हक्कसोड पत्राबाबत)**

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामामुळे स्थलांतरीत होणाऱ्या कोंबडभुजे येथील सिडकोच्या जमिनीवरील बांधकाम क्र. KB-२१३ हे श्री. लक्ष्मण तुळशीराम भगत यांचेकडून संपादित झालेली आहे. सदर बांधकाम धारकांना भूखंड क्र. २८८, सेक्टर-२५, क्षेत्र-५६० चौ.मी. चे वाटपपत्र देण्यात आलेले आहे.

| गावाचे नाव/ संचिका क्र. | बांधकाम क्र. | सहबांधकामधारकाचे नाव | बांधकामाचे छपराखालील क्षेत्र (चौ.मी.) | वाटपित भूखंडाचा तपशिल | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ.मी.) |
| कोंबडभुजे | KB-२१६ व KB-२१७ | **श्रीमती मिना जगदीश भगत, श्री. लक्ष्मण तुळशीराम भगत (मयत) वारस श्रीमती जनाबाई लक्ष्मण भगत (मयत) वारस** - १) श्री. मनिष लक्ष्मण भगत २) सौ. वासंती देवराज शेलार ३) सौ. सुगंधा प्रकाश कोळी ४) सौ. हेमलता कमलाकर तांडेल | ७९.९२ | पुष्पक वहाळ | २५ | २८८ | ५६० |

श्री. लक्ष्मण तुळशीराम भगत वारस श्रीमती जनाबाई लक्ष्मण भगत हे दोघे मयत आहेत व त्यांचे वारसांपैकी १) सौ. वासंती देवराज शेलार २) सौ. सुगंधा प्रकाश कोळी ३) सौ. हेमलता कमलाकर तांडेल यांनी श्री. मनिष लक्ष्मण भगत यांना इरादित भूखंड क्र. २८८, सेक्टर-२५, क्षेत्र-५६० चौ.मी. हिस्स्याचे हक्कसोड पत्र सह दुय्यम निबंधक वर्ग-२ (पनवेल-५) येथील मे पवल-५-७४७८-२०२२, पावती क्र. ८०७१ दिनांक ०४.०५.२०२२ हे सादर केले आहे.

उपरोक्त हक्कसोडपत्राप्रमाणे भूखंड क्र. २८८, सेक्टर-२५, क्षेत्र-५६० चौ.मी. यामधील श्री. लक्ष्मण तुळशीराम भगत वारस श्रीमती जनाबाई लक्ष्मण भगत यांचे वारसांनी त्यांचा हिस्सा श्री. मनिष लक्ष्मण भगत यांस देण्यास संमती दिली आहेत व तसेच सह दुय्यम निबंधक श्री. मनिष लक्ष्मण भगत यांच्या लाभात पवल-५-७४७८ दिनांक ०४.०५.२०२२ अन्वये हक्कसोड बाबत आदेश पारित केलेले आहे.

उपरोक्त हक्कसोडपत्र विचारात घेऊन ज्यांनी वाटपित भूखंडामधील हक्क व हितसंबंध सोडून दिलेले आहेत. त्यांची नावे वगळून ज्यांना जे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत. अशा व्यक्तीच्या नावे सिडकोकडून भूखंडाचे करारनामा करून भूखंडाचा ताबा आजच्या तारखेपासून ३० दिवसांत कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

वरील वाटपित केलेल्या भूखंडा संदर्भात वर नमुद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत/तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत/तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायालयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करून सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतींसह **अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (विमानतळ) तळ मजला, सिडको भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई** यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्यत्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमुद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील वाटपित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/१४१/२०२२-२३



मा.सोनावणे साहेब कोर्ट

प्रो.जमा रु.५०/- **अर्जदारतर्फे वकील**
**ॲड.श्री.मनोज म्हात्रे, ॲड.ज्योती सरोदे**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब, वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.८८८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२१/०७/२०२२

श्रीम.सुनिता कांतीलाल अहिरराव
वय : ३७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रुम नं.०२, आशिर्वाद सीएचएस,
प्लॉट नं.बी.५५, सेक्टर १४, कळंबोली,
नवी मुंबई, पो.कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ हिचे पती कै.कांतीलाल चिंधू अहिरराव यांचा मृत्यू दि.१८/०३/२०२१ रोजी पुणतांबा, ता.राहाता, जि.अहमदनगर येथे झालेला असून कै.कांतीलाल चिंधू अहिरराव हे हयात असताना त्यांच्या मृत्यूपूर्वी त्यांचे मालकी हक्कात सिडकोने विकसित केलेल्या मौजे : कळंबोली हद्दीत, ता.पनवेल, जि.रायगड येथील स्थावर मिळकतीचे SALE DEED CUM CONVEYANCE DEED या इंग्रजी मध्ये दि.०९/०६/२००५ रोजी नोंदणी केलेल्या दस्त क्र.पवल-३, क्र.१६८५/२००५ या इंग्रजीमध्ये केलेल्या करारात वर्णन खालीलप्रमाणे आहे.

DESCRIPTION OF PROPERTY

| | |
|---|---|
| PLOT NO. | B-55 |
| UNIT NO. | 2 |
| TYPE NO. | SS-1C |
| AREA | 32 SQ. MTRS. |
| SECTOR | 14 |
| NODE | KALAMBOLI. DIST. RAIGAD |
| SOCIETY : M/S. AASHRIWAD CO.OP.HSG. SOC. LTD. | |
| REGN NO: NBOM/CIDCO/HSG/(OH)/360/JTR/95-96 | |
| BUILDING | |
| SALE PRICE : RS.1,00,000/- | |

वरील निवासी सदनिके संदर्भात अर्जदार यांना वारस दाखला मिळणेकरिता या मे.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांना वारस दाखला देण्याबाबत कुणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात योग्य त्या कागदपत्रकासह सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांकडून कायदेशीर साक्षी पुरावे नोंदवून अर्जदार यांना वारस दाखला प्रदान करण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

आज दि.४/०७/२०२२ रोजी कोर्टाच्या सहीशिक्क्याने दिली.

**सही/-**
**लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.सोनावणे साहेब कोर्ट
**ॲड.शशिकांत काळू म्हात्रे**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.८७९/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०६/०८/२०२२

१) जिजाबाई कृष्णा खुटारकर
वय : ७३ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.प्रकाश कृष्णा खुटारकर
वय : ४८ वर्षे, धंदा : व्यवसाय
३) श्री.निलेश कृष्णा खुटारकर
वयः ३८ वर्षे, धंदा : नोकरी
४) श्री.अंकुश कृष्णा खुटारकर
वय : ३७ वर्षे,धंदा : नोकरी
रा.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड
५) सौ.कविता सुनील कुंभारकर
वय : ३५ वर्षे, धंदा : नोकरी
कुंभारकर आळी, गणेश मंदिराजवळ,
मु.चिंध्रण, पो.देवीचापाडा, ता.पनवेल, जि.रायगड
६) उषा मोहन निघुकर
वय : ३७ वर्षे, धंदा : नोकरी
रा.घोट, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ६ यांचे वडील कै.कृष्णा तुकाराम खुटारकर हे दि.१२/१२/२०२१ रोजी मौजे : नावडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. तसेच त्यांची आई कै.नागुबाई तुकाराम खुटारकर ह्या मौजे : नावडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे फार वर्षापूर्वी मयत झाल्या आहेत.

कै.कृष्णा तुकाराम खुटारकर यांचे वडिलांच्या नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| नावडे | ५१ | २४७ | १५ | १-२४-४ |
| | ५१ | २४६ | ५ | ०-४९-१ |
| | ९८ | १६७ | ९ | ०-४९-५ |

सदरच्या मिळकती ह्या नवीन मुंबई प्रकल्पाकरिता सिडकोने संपादीत केल्या आहेत. सदर मिळकतीचा अवॉर्ड हा कै.कृष्णा तुकाराम खुटारकर यांच्या वडिलांच्या नावाने प्रसिद्ध झालेला आहे.

तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.कृष्णा तुकाराम खुटारकर यांचे वारसदार या नात्याने कै.कृष्णा तुकाराम खुटारकर यांचे हिश्श्याचे सरकारकडून मिळणारे किंवा सिडकोकडून मिळणारे १२.५ टक्के भूखंड तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.सह दिवाणी न्या.व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळतीतील कै.कृष्णा तुकाराम खुटारकर यांचे हिश्श्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख ०५/०७/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## श्री साई नारायण बाबा आश्रम यांच्या मार्फत ८३ वा शास्त्रयुक्त कन्यादान सोहळा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल येथील श्री साई नारायण बाबा आश्रम व श्री भगवती साई संस्थान यांच्या वतीने ८३ वा शास्त्रयुक्त कन्यादान सोहळा शनिवार दिनांक ०९ जुलै २०२२ रोजी आयोजित करण्यात आला आहे .

सद्गुरू श्री साई नारायण बाबा यांच्या आशीर्वादाने ८३ वा शास्त्रयुक्त कन्यादान सोहळा श्री साई बाबा मंदिर स्टेशन रोड पनवेल येथे आयोजित करण्यात आला असून, अंत्यत शास्त्रयुक्त पद्धतीने हा सोहळा संपन्न होणार असून या ठिकाणी या कन्यादान सोहळ्या निमित्त येणारा सर्व खर्च श्री साई नारायण बाबा आश्रम व श्री भगवती साई संस्थान यांच्या वतीने करण्यात येणार आहे . तरी वधू – वराना आशीर्वाद देण्यासाठी सर्वानी उपथित रहावे असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे .

## जिल्ह्यात दिवसभरात सरासरी १४३ मि.मी. पावसाची झाली नोंद

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यात गेल्या २४ तासात सरासरी १४३.८० मि.मी इतक्या पावसाची नोंद झाली आहे. तसेच दि.०१ जून पासून आज अखेर एकूण सरासरी ६९६.६४ मि.मी. पर्जन्यमानाची नोंद झाली आहे.

अलिबाग–८८.०० मि.मी., पेण–१३९.०० मि.मी., मुरुड– ११६.०० मि.मी., पनवेल– १७२.२० मि.मी., उरण– १४६.०० मि.मी., कर्जत– १०१.६० मि.मी., खालापूर– १३५.०० मि.मी., माणगाव– २३०.०० मि.मी., रोहा– १०७.०० मि.मी., सुधागड–१३४.०० मि.मी., तळा– २४५.०० मि.मी., महाड–१८८.०० मि.मी., पोलादपूर–१६९.०० मि.मी, म्हसळा–१२७.०० मि.मी., श्रीवर्धन– ८१.०० मि.मी., माथेरान– १२२.०० मि.मी. असे आजचे एकूण पर्जन्यमान २ हजार ३००.८० मि.मी. इतके आहे. त्याची सरासरी १४३.८० मि.मी. इतकी आहे. एकूण सरासरी पर्जन्यमानाची टक्केवारी २२.४६ टक्के इतकी आहे.रायगड जिल्ह्यात मागील वर्षी दि.५ जुलै २०२१ रोजी सरासरी २.८४ मि.मी इतक्या पावसाची नोंद झाली होती. तसेच दि.०१ जून पासून ५ जुलै २०२१ अखेर पर्यंत एकूण सरासरी १ हजार ००३.५३ मि.मी. पर्जन्यमानाची नोंद झाली होती.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# बोर्लीला भर पावसात प्रवाशांचे हाल ; अद्याप एसटीचा कारभार वाऱ्यावर

## आणखी किती दिवस बसस्थानकाची प्रतीक्षा?



**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन शहराला अद्यापही बसस्थानक मिळालं नाही. त्यामुळे येथे येणाऱ्या शालेय विद्यार्थी तसेच इतर प्रवाशांनी धो – धो पडणाऱ्या पावसात थांबायचे कुठे, असा प्रश्न भेडसावत आहे. मात्र, सातत्याने मागणी होत असताना एसटी महामंडळाच्या दुर्लक्षित कारभारामुळे प्रवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

बोर्लीपंचतन बसस्थानकाला दिघी विभागातील अनेक गावे तसेच दिवेआगर, हरिहरेश्वर, दिघी – जंजिरा अशी पर्यटन स्थळे एसटी वाहतुकीने जोडली गेली आहेत. येथे दिवसातून येणाऱ्या – जाणाऱ्या ६४ गाड्यांची नोंद होत असून मुंबई, पुणे शहारांसह गाव खेड्यातील नागरिक प्रवास करत आहेत. मात्र, शहरात असणारे बस स्थानक दहा महिन्यांपूर्वीच अतिक्रमणमध्ये हटवण्यात आलं. परिणामी आता शाळा सुरू झाल्या आणि शेकडो विद्यार्थी व प्रवासी भर पावसात बसची वाट बघत रस्त्यावर ताटकळत उभे राहत असल्याने पालक वर्गातून चिंता होत आहे. मागील कित्येक महिन्यापासून होत असलेली बसस्थानकाची मागणी अजुनपर्यंत पूर्ण झाली नसल्याने येथील नागरिक तथा प्रवाशी संताप व्यक्त करीत आहे.

याठिकाणी जिल्हा परिषद, महाविद्यालय व इंग्रजी माध्यमाच्या विविध शाळा आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना बोर्लीपंचतनला शिक्षण घेण्याकरिता आल्याशिवाय पर्याय नाही. शहराच्या वाढत्या महत्वानुसार येथे कित्येक वर्षापूर्वीच मोठे बसस्थानक होणे आवश्यक होते. परंतु लोकप्रतिनिधींच्या अनास्थेमुळे ते होऊ शकले नाही. परिसरातील हजारो विद्यार्थी येथे शिक्षण घेतात.

ग्राहकांचा, विद्यार्थ्यांचा व प्रवाशांचा संबंध बसस्थानकाशी येतो. मात्र, प्रवाशांना उभे राहण्यासाठी कोणतीच निवारा शेड नाही. सध्या पावसाळी दिवसांमध्ये प्रवासा दरम्यान या सर्वांनी आसरा घ्यायचा कसा, असा प्रश्न पडतो. मागील अनेक महिने त्रास सहन करीत बसची वाट बघावी लागते.

सुविधा मिळाव्यात यासाठी महामंडळाकडून अनेक पावले उचलली जात आहेत. मात्र, ग्रामीण भागातून उलट चित्र पाहायला मिळत आहे. बोर्लीपंचतन येथून येणाऱ्या – जाणाऱ्या ६४ गाड्यांची नोंद होत असून जवळपास येथील ६०० शालेय विद्यार्थी शिक्षणासाठी दिघी, म्हसळा, बोर्ली व श्रीवर्धन असा प्रवास करीत आहेत. तसेच शहराच्या परिसरातील ४० गावांना एसटी सुविधा मिळाव्यात या विचाराने आतातरी एसटी विभागाकडून तात्पुरत्या शेडसह एका कर्मचारी नियुक्ती करण्यात यावी. त्यामुळे प्रवाशांच्या समस्या दूर होतील.

अधिक माहितीसाठी पेण विभाग तसेच श्रीवर्धन आगारप्रमुख यांच्याकडे संपर्क साधला असता नेहमीप्रमाणे नॉट रीचेबल उत्तर मिळत आहे. त्यामुळे या समस्येकडे महामंडळाच्या जबाबदार अधिकाऱ्यांकडून तसेच स्थानिक प्रशासनाकडून देखील दुर्लक्ष केलं जात आहे.

## तळा नगरपंचायतीने वाहने पार्कींग व वाहतूक पोलीस अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याची मागणी



**दै.रायगड नगरी । तळा**

तळा नगरपंचायतीचा कारभार राष्ट्रवादी पक्षाच्या ताब्यात असून अवघ्या चार महिन्यात खासदार सुनील तटकरे यांनी निवडणूक काळात दिलेल्या आश्वासनाची पुर्तता करण्याचा आरंभ केला असून शहरात विकासकामाची गंगा वाहू लागली आहे सद्यस्थितीत बाजारपेठेतील रस्ता काँक्रीटीकरण जवळपास पूर्ण होत आले आहे त्यामुळे काही काळ वेगळे वैभव प्राप्त झालेले दिसून येत आहे. मात्र गटाराचे बाजूने वाढीव बांधकाम करून रस्ता अरूंद केला आहे यापूर्वी देखील वाहने उभी करून वा–हतूक कोंडी होत होती आता तर त्यामध्ये अधिकभर पडली आहे. शहरात वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून रस्त्यावर अतीक्रमणे होणार नाही याची काळजी घेणे महत्त्वाचे ठरणार आहे तसेच मोटार सायकल, खाजगी वाहन चालक मालक लगतचे व्यवसायीक यांना स्मरणपत्र देणे, किंवा बोर्ड लावणे व पार्किंगची व्यवस्था करून पे अँन्ड पार्किंग करून नगरपंचायतीला उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करणे अशी देखील मागणी होत आहे. त्याचप्रमाणे जिल्हा वाहतूक नियंत्रण कक्षा कडून कायम स्वरूपी वाहतूक पोलीस अधिकारी यांची मागणी स्थानिक नागरीक, व्यवसायीक, चालक जेष्ठ नागरिक यांच्याकडून केली जात आहे. याबाबत नगरपंचायत प्रशासन ठोस पावले उचलून नागरिकांना सहकार्य करावे अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांना मोफत वह्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारतीय जनता पक्ष उलवे नोड १ व २ आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने वह्या वाटपाचा कार्यक्रम राबवण्यास सुरुवात झाली. या अंतर्गत

पनवेल तालुक्यातील शेलघर, बामणडोंगरी, बेलपाडा, जावळे येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते मोफत वह्यांचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.

सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रम राबवून गरीब व गरजूंना नेहमीच मदतीचा हात देणार्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने दरवर्षी गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात येते.

या उपक्रमाचे कौतुक होत आहे.यावेळी शेलघर अध्यक्ष अमृत भगत, तालुका चिटणीस जयवंत देशमुख, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, सुहास भगत, अनिल कोळी, श्रीधर भगत, ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रल्हाद भगत, अजय भगत, रमेश घरत, राजू भगत, प्रभाकर भगत, माजी सदस्या इंदूताई पाटील, अशोक घरत, सतिश म्हात्रे, संतोष म्हात्रे, बेलपाडा अध्यक्ष गणेश पाटील, द. जा. कोळी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष महेश पाटील, उपाध्यक्ष अतिश पाटील, अशोक कोळी, निशा कोळी, प्रणाली ठाकूर, कविता म्हात्रे, अश्विनी कोळी, अंकुश ठाकूर, साजन भोईर, वहाळ ग्रामपंचायतीच्या सदस्या गिता ठाकूर, मनोज नाईक, बामणडोंगरी गाव अध्यक्ष नंदकुमार ठाकूर, दीपक गोंधळी, पदाजी नाईक, निलेश खोत, चिटणीस रवी शिंदे, उलवड नोड १ अध्यक्ष मदन पाटील, रामदास नाईक, मनोज नाईक, सुवर्णा ठाकूर, समाधान पाटील, निलेश म्हात्रे, अलंकार म्हात्रे, सांस्कृतीक सेल अध्यक्ष नान गडकरी, प्रसाद घरत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमात शेलघर येथील शाळेत १०७, बेलपाडा येथील शाळेत ३६४, बामणडोंगरी येथील शाळेत ११३३ तर जावळे येथील शाळेत १३२ वह्यांचे वाटप करण्यात आले.



## रास्तभाव धान्य दुकानदारांचे धरणे आंदोलन



**दै.रायगड नगरी । मुरुड**

देश पातळीवर अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत कोव्हीड १९ चा भयंकर प्रसार होत असताना सुद्धा स्वस्त धान्य दुकानदारांनी आपल्या जीवाची पर्वा न करता ८० करोड़ जनतेला अविरत धान्य पुरवठा करून शासनाला महत्वाचे सहकार्य केले होते. अशा महामारीत कोणताही भूक बळी झाला नाही. परंतु याची साधी दखल सरकारने न घेता परवाना धारकांना कोरोना योद्धा सुद्धा घोषित करण्यात आलेले नाही. राष्ट्रीय खाद्य सुरक्षा योजनांद्वारे परवाना धारकांना वर्ल्ड फूड प्रोग्रॅम अंतर्गत ४४० प्रति क्विंटल कमिशन देण्यात यावे. किंवा दर महा ५० हजार मानधन घोषित करण्याची मागणी मुरुड तालुका रास्त भाव धान्य दुकान संघटनेतर्फे मुरुड तहसीलदार याना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

सदरचे निवेदन नायबतहसीलदार गोविंद कौटुंबे यांनी स्वीकारले. यावेळी मुरुड तालुका रास्त भाव धान्य दुकान संघटनेचे अध्यक्ष गिरीश साळी, उपाध्यक्ष किशोर धामणस्कर, सचिव मंगेश कांबळे, अजित कासार, सचिन कासेकर व मुरुड तालुक्यातील सर्व दुकानदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी तहसीलदार यांना निवेदन दिल्यानंतर हे सर्व दुकानदार यांनी संपूर्ण दिवस धरणे आंदोलन केले.

## पनवेल तहसील कार्यालयासमोर होतेय वाहतूक कोंडी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल–साईनगर येथील तहसील कार्यालयासमोर दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. अनेक चारचाकी वाहने अस्तावस्त पार्क करत असल्याने नागरिक वैतागले आहेत. त्यामुळे वाहतूक पोलिसांनी यावर कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे.

तहसील कार्यालय व पनवेल शहर पोलीस स्टेशन यामुळे साईनगर परिसर नेहमी गजबजलेला असतो. नागरिकांची व वाहनांची येथे मोठ्या प्रमाणात येथे वर्दळ सुरू असते. चार चाकी व दुचाकी येथे वाहने कशीही पार्क करत असल्यामुळे वाहतुकीला नेहमीच अडथळे निर्माण होत आहेत. रस्त्यावरच वाहने पार्क होत असल्याने काही वेळेला पोलिसांची वाहने पोलीस स्टेशनमध्ये जाण्यासाठी समस्या निर्माण होत आहे. एखाद वेळेस तहसीलदारांची गाडी लावण्यासाठी देखील येथे जागा नसते. अस्तावस्त लावलेल्या गाड्यांचा त्रास येथील नागरिक, तसेच शासकीय अधिकारी, पोलीस यांना सहन करावा लागत आहे. याच ठिकाणी वडापावच्या गाड्या देखील लावण्यात आलेल्या आहेत. त्यांच्यावर पनवेल पालिकेच्या अतिक्रमण विभागाने कारवाई करायला हवी. अस्ताव्यस्त वाहने लावून वाहतूक कोंडी करणाऱ्यांवर वाहतूक पोलिसांनी वेळीच यावर कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिक करत आहेत.



**जनकल्याण बँकेचे कॅशिअर विचारे हे सेवानिवृत्त झाल्यावर त्यांच्या मित्र परिवाराने शाल, श्रीफळ देवून सत्कार केला. त्यावेळी रमेश गायकवाड, लक्ष्मण तळकर, सुनील पोतदार, गुजर हे उपस्थित होते.**

## आदिवासी महिलांनी घेतले शेळीपालन व कुक्कुटपालनाचे धडे



**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प पेण यांच्या संयुक्त विद्यमाने आदिम जमाती संवर्धन व विकास कार्यक्रम अंतर्गत शेळीपालन, कुक्कुटपालन व व्यवस्थापन या विषयांचे एक दिवसीय प्रशिक्षण शिबीर नुकतेच सुधागड तालुक्यातील उन्हेरे बु. आदिवासीवाडी संपन्न झाला. यावेळी आदिवासी महिलांनी शेळीपालन व कुक्कुटपालनाचे धडे घेतले.

या कार्यक्रमात पशुधन विकास अधिकारी डॉ. प्रशांत कोकरे यांनी कुक्कुटपालन महत्व, प्रजाती, अंडी पैदास, पिल्लांचे संगोपन, लसीकरण तसेच शे–ळीपालन महत्व, खाद्या प्रमाण, पिल्ले संगोपन, लसीकरण, अर्थशास्त्र याबाबत सविस्तर सादरीकरणाद्वारे मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी शेळ्यांच्या लसीकरणाचे प्रात्यक्षिक देखील दाखवले. आदिवासी प्रकल्प कार्यालय पेण प्रतिनिधी ए. एम. वारुळे यांनी आदिवासी प्रशिक्षणाचे महत्व सांगितले. तसेच जे. बी. झगडे यांनी कृषी विभागाच्या योजनाची माहिती दिली. ताया शिंगवा यांनी परसातील कुक्कुटपालन या व्यवसायाबाबत आलेले अनुभव कथन केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक प्राजक्ता पाटील यांनी केले. प्रशिक्षण संपन्न झाल्यावर प्रशिक्षण सहभाग प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. त्यानंतर बेबी पवार यांनी मनोगत व्यक्त केले. मूल्यांकन व आदिवासी नृत्याने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमासाठी पशुधन विकास अधिकारी सुधागड डॉ. प्रशांत कोकरे, आदिवासी प्रकल्प कार्यालय पेण प्रतिनिधी ए.एम. वारुळे, तालुका कृषी अधिकारी जे.बी. झगडे, स्वदेस फाऊंडेशनचे समन्वयक राकेश मोरे, मंडळ कृषी अधिकारी पाली बी.सी. वाळके, कृषी पर्यवेक्षक पाली यू. डी. भोसले, कृषी पर्यवेक्षक जी. एम. गायकवाड, तंत्र सहाय्यक एस. ए. जाधव, कृषी सहाय्यक पिलोसरी श्रीमती बंकवाड, आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राजक्ता पाटील–काटकर तर आभार प्रदर्शन बी. सी. वाळके यांनी केले .

## जिल्ह्यातील तहसिल कार्यालयांमध्ये आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील तहसिल कार्यालयांमध्ये आपत्ती व्यवस्थापन व आपत्ती निवारण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

या आपत्ती व्यवस्थापन कक्षांमध्ये तालुक्यातील नैसर्गिक आपत्तीच्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या दुर्घटनांबाबत सूचना देण्याकरिता तसेच अनुषंगिक माहितीसाठी तहसिल कार्यालयांमधील दूरध्वनी क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांकाची माहिती पुढीलप्रमाणे.

तहसिल कार्यालय, अलिबाग–०२१४१–२२२०५४, भ्रमणध्वनी–८२७५२७८२१८, तहसिल कार्यालय, पेण– ०२१४३ – २५२०३६, भ्रमणध्वनी–८४५९४८२९३७, तहसिल कार्यालय, मुरुड – ०२१४४– २७४०२६, भ्रमणध्वनी– ७०२०५७३६२०, तहसिल कार्यालय, पनवेल – ०२२ – २७४५२३९९, भ्रमणध्वनी– ८३६९८९९९०२, तहसिल कार्यालय, उरण – ०२२–२७२२२३५२ भ्रमणध्वनी – ९८९२५३८४०९, तहसिल कार्यालय, कर्जत – ०२१४८ – २२२०३७ भ्रमणध्वनी– ९३७३९२२९०९, तहसिल कार्यालय, खालापूर– ०२१९२ – २७५०४८, भ्रमणध्वनी – ८२६२८९८७८८, तहसिल कार्यालय, तळा – ०२१४०–२६९३१७, भ्रमणध्वनी – ७०६६०६९३१७, तहसिल कार्यालय, माणगाव– ०२१४० – २६२६३२ भ्रमणध्वनी – ७४९८१९१२४४, तहसिल कार्यालय, रोहा – ०२१९४ – २३३२२२, भ्रमणध्वनी – ९०२२९७०३९४, तहसिल कार्यालय, सुधागड – ०२१४२–२४२६६५, भ्रमणध्वनी – ८८३०३३३७४७, तहसिल कार्यालय, श्रीवर्धन – ०२१४७ – २२२२२६, भ्रमणध्वनी – ९२८४७३०७५३ / ७२४९५७९१५८, तहसिल कार्यालय, म्हसळा – ०२१४९ – २३२२२४, भ्रमणध्वनी– ८४५९७९५३२६, तहसिल कार्यालय, महाड – ०२१४५ – २२२१४२ / २२३७८३, भ्रमणध्वनी– ८२६३०८६३५५, तहसिल कार्यालय, पोलादपूर – ०२१९१–२४००२६, भ्रमणध्वनी – ८९९९०६७५१०.

तरी प्रशासन नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पूर्णतः सज्ज असून जिल्ह्यातील नागरिकांनी नैसर्गिक आपत्तीच्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या दुर्घटनांबाबत सूचना देण्याकरिता तसेच अनुषंगिक माहितीसाठी या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी केले आहे.